19 MAR 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

देशातील सहा आघाडीच्या विद्यापीठांत समावेश

# शिवाजी विद्यापीठाच्या युवा संसद संघाचा राष्ट्रीय स्तरावर आवाज

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

सोळाव्या राष्ट्रीय युवा संसदेमध्ये देशभरातील विद्यापीठांमधून राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या अंतिम सहा संघामध्ये शिवाजी विद्यापीठाची निवड झाल्याबद्दलचे संसदीय कार्य मंत्रालयाचे उपसचिव ए. बी. आचार्या यांचे पत्र शिवाजी विद्यापीठाला प्राप्त झाल्याची माहिती विद्यापीठ युवा संसद स्पर्धेचे समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी दिली.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा युवा संसद संघ.**

भारत सरकारच्या संसदीय कार्य मंत्रालयामार्फत १६ वी राष्ट्रीय युवा संसद स्पर्धा शिवाजी विद्यापीठात २९ एप्रिल, २०२२ रोजी झाली. संसदीय कार्य मंत्रालयामार्फत समूह समन्वयक डॉ. एस. पी. सिंग, पाटणा (बिहार) आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे येथील डॉ. एस. बी. देवसरकार यांच्या परिक्षणाखाली आणि कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम झाला. या राष्ट्रीय युवा संसदेमध्ये शपथविधी, श्रध्दांजली, नवीन मंत्र्यांची ओळख, प्रश्नोत्तराचा तास, शुन्य प्रहर, विशेषधिकाराचा भंग, राज्यसभेतील संदेश, आयत्या वेळेचे विषय, बिल (कायदा) पारित करणे इ. संसदीय कामकाजाचे मुद्दे घेण्यात आले होते. यामध्ये स्वच्छ भारत, शेतकऱ्यांचे प्रश्न, पर्यावरणाचे प्रश्न, देशांतर्गत आणि देशाबाहेरील सुरक्षेचे प्रश्न, आव्हाने इ. बाबतीत अभ्यासपूर्ण चर्चा झाली. चाईल्ड मॅरेज (प्रोटेक्शन ॲक्ट) २०२२ बिल पारित करण्यात आले होते. महिलांच्या प्रश्नांवर जोरदार चर्चा झाली. सोळाव्या राष्ट्रीय युवा संसदेतील वंदना रंगलानी, आशिया जामदार, तेजस सन्मुख, प्रीती पाटील, स्नेहा मगदूम प्रज्वल माळी, सद्दाम मुजावर, श्रेया म्हापसेकर यांना उत्कृष्ट संसदपटू पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. भारत सरकारच्या संसदीय कार्य मंत्रालयामार्फत देशभरातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये प्रत्येक वर्षी या स्पर्धेचे आयोजन केले जाते. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमधून सक्षम नेतृत्व विकसित होते. भारतीय संसदेचे कामकाज कसे चालते, याचे आकलन होते. कायदा पास करण्याची प्रक्रिया समजते. यामुळे ही स्पर्धा विद्यार्थ्यांना फार उपयुक्त आहे. शिवाजी विद्यापीठाने या स्पर्धेमध्ये राष्ट्रीय स्तरावर नावलौकीक मिळवणे ही गौरवाची बाब आहे. प्रथम क्रमांक मिळविण्यासाठीही आपला संघ निश्चित प्रयत्न करेल, असा विश्वासही डॉ. माने यांनी व्यक्त केला.

1 9 MAR 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र संघांमध्ये शिवाजी विद्यापीठाची निवड

कोल्हापूर : प्रतिनिधी

सोळाव्या राष्ट्रीय युवा संसदेमध्ये देशभरातील विद्यापीठांमधून राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या अंतिम सहा संघांमध्ये शिवाजी विद्यापीठाची निवड झाल्याबद्दलचे संसदीय कार्य मंत्रालयाचे उपसचिव ए. बी. आचार्या यांचे पत्र नुकतेच शिवाजी विद्यापीठाला प्राप्त झाले आहे, अशी माहिती विद्यापीठ युवा संसद स्पर्धेचे समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी शुक्रवारी दिली.

डॉ. माने यांनी दिलेल्या माहितीनुसार, भारत सरकारच्या संसदीय कार्य मंत्रालयामार्फत १६ वी राष्ट्रीय युवा संसद स्पर्धा शिवाजी विद्यापीठात २९ एप्रिल, २०२२ रोजी झाली. संसदीय कार्य मंत्रालयामार्फत समूह समन्वयक



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा युवा संसद संघ

डॉ. एस. पी. सिंग, पाटणा (बिहार) आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे येथील डॉ. एस. बी. देवसरकार यांच्या परीक्षणाखाली आणि कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम झाला.

राष्ट्रीय युवा संसदेमध्ये विविध प्रश्नांवर चर्चा झाली. युवा संसदेतील वंदना रंगलानी, आशिया जामदार, तेजस सन्मुख, प्रीती पाटील, स्नेहा मगदूम, प्रज्वल माळी, सद्दाम मुजावर, श्रेया म्हापसेकर यांना उत्कृष्ट संसदपटू पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

भारत सरकारच्या संसदीय कार्य मंत्रालयामार्फत देशभरातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये प्रत्येक वर्षी या स्पर्धेचे आयोजन केले जाते. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमधून सक्षम नेतृत्व विकसित होते. देशभरातील सहा संघांतून प्रथम क्रमांक मिळवण्यासाठीही आपला संघ निश्चित प्रयत्न करेल, असा विश्वासही डॉ. माने यांनी व्यक्त केला. युवा संसद संघाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी अभिनंदन केले.

पुण्यनगरी

# वन दिनानिमित्त परिसंवादाचे आयोजन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र, पर्यावरणशास्त्र व यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, दि. २३ रोजी आंतरराष्ट्रीय वन दिनानिमित्त 'जंगल आणि आदिवासी समाज' या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉ. प्रकाश राऊत, पर्यावरण अभ्यासक उदय गायकवाड आणि श्रमिक मुक्ती दलाचे संपत देसाई हे प्रमुख वक्ते म्हणून मांडणी करणार आहेत. याप्रसंगी कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये सकाळी १०.३० वा. हा परिसंवाद सुरू होणार आहे, अशी माहिती सामाजिक वंचितता व समावेश धोरण अभ्यास केंद्राचे संचालक डॉ. एस. एस. महाजन यांनी दिली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 MAR 2023
लोकमत

# शिवाजी विद्यापीठाच्या दोन्ही संघांचा विजय

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत प्राथमिक फेरीच्या शिवाजी विद्यापीठाच्या दोन्ही संघांसह मुंबई व नांदेड विद्यापीठांनी शनिवारी विजय नोंदविले.

पहिल्या सामन्यात मुंबई विद्यापीठ संघाने महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक ५५ धावांनी पराभव केला. दुसऱ्या सामन्यात शिवाजी विद्यापीठ (ब) संघाने लोणेरे संघावर ४ गडी राखून मात केली. लोणेरे संघाने १९.३ षटकांत १० बाद १०८ धावा केल्या. उत्तरादाखल खेळताना शिवाजी विद्यापीठ (ब) संघाने हे आव्हान १५ षटकात ६ गड्यांच्या मोबदल्यात ११४ धावा करीत पार केला.

तिसऱ्या सामन्यांत यजमान शिवाजी विद्यापीठ संघाने महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर संघाचा ७ गडी राखून पराभव केला. नागपूर संघाने २० षटकात ९ बाद ११८ धावांचे लक्ष्य शिवाजी विद्यापीठ संघासमोर ठेवले. हे आव्हान विद्यापीठ संघाने १६.४ षटकात ३ गड्यांच्या मोबदल्यात १२१ धावा करीत विजय मिळवला.

चौथ्या सामन्यात नांदेड विद्यापीठाने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिकचा ४ गडी राखून पराभव केला.

लोकमत

# विद्यापीठात गुरुवारी परिसंवाद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे सामाजिक वंचितता आणि समावेशक धोरण अभ्यास केंद्र, पर्यावरणशास्त्र व यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट यांच्यातर्फे गुरुवार, दिनांक २३ मार्च रोजी आंतरराष्ट्रीय वन दिनानिमित्त 'जंगल आणि आदिवासी समाज' या विषयावर परिसंवाद होत आहे.

या परिसंवादात ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉ. प्रकाश राऊत, पर्यावरण अभ्यासक उदय गायकवाड आणि श्रमिक मुक्ती दलाचे ज्येष्ठ कार्यकर्ते संपत देसाई हे प्रमुख वक्ते म्हणून मांडणी करणार आहेत. मानव्यशास्त्र सभागृहामध्ये सकाळी १०:३० वाजता हा परिसंवाद होईल.

लोकमत

Estd : 1962
'A++' Accredited by NAAC
(2021)
with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

## ५९ वा वार्षिक दीक्षांत समारंभ
## विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचे निवेदन

सर्व स्नातक आणि संबंधित घटकांना कळविण्यात येते की, गुरुवार दि. १६ फेब्रुवारी, २०२३ रोजी होणारा ५९ वा दीक्षांत समारंभ काही अपरिहार्य कारणास्तव स्थगित करण्यात आला होता. सदरचा दीक्षांत समारंभ बुधवार दिनांक २९/०३/२०२३ रोजी संपन्न होत आहे. याची नोंद घ्यावी.

दीक्षांत समारंभाच्या अनुषंगाने संपूर्ण माहिती सर्व संबंधितांकरीता नजिकच्या कालावधीमध्ये विद्यापीठाचे संकेतस्थळावर (www.unishivaji.ac.in) प्रसिद्ध करणेत येईल याची नोंद घ्यावी.

दीक्षांत विभाग
दि:१९/०३/२०२३

डॉ. अजितसिंह एन. जाधव
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

पुढारी

# यशवंतराव चव्हाण यांचा आदर्श घेऊन युवकांनी ग्रामविकास साधावा

## इंद्रजित देशमुख

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

ज्येष्ठ नेते यशवंतराव चव्हाण यांचा आदर्श घेऊन युवकांनी ग्रामीण विकासाचे स्वप्न पूर्ण करावे, असे प्रतिपादन माजी सनदी अधिकारी इंद्रजित देशमुख यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण अध्यासनामार्फत यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'यशवंतराव चव्हाण व स्थानिक स्वराज्य संस्था' या चर्चासत्रामध्ये ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते.

देशमुख म्हणाले, यशवंतराव चव्हाण काळाचे भान असणारे नेते व तळागाळातील प्रत्येकाला आपले वाटणारे व्यक्तिमत्त्व होते. आजच्या पिढीने यशवंतरावांची कामाची शैली, भ्रष्टाचारमुक्त कारभार व तळागाळातील माणसाप्रतीची तळमळ ही तत्त्वे आत्मसात करून वाटचाल करावी.

शारदाबाई पवार अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी मार्गदर्शन केले. डॉ. नितीन माळी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. ऊर्मिला दशवंत, डॉ. मुनकीर मुजावर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. उमेश गाडेकर यांनी आभार मानले.

1 9 MAR 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या दोन्ही संघांसह मुंबई, नांदेडचे विजय

## आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत प्राथमिक फेरीच्या सहाव्या दिवशी (शनिवार) शिवाजी विद्यापीठाच्या दोन्ही संघांसह मुंबई व नांदेड विद्यापीठांनी विजयासह आगेकूच केली.

**मुंबई विद्यापीठ ५५ धावांनी विजयी**

मुंबई संघाने २० षटकांत ६ बाद १६४ धावा केल्या. संजय पवारने ६६, विपूल खंडारेने ४८ धावा केल्या. नाशिकच्या संदीप चौधरीने २ विकेट्स घेतल्या. नाशिक संघाने संघ २० षटकात ९ बाद १०९ धावांपर्यंत मजल मारू शकला. राजेंद्र शहाणेने २४, नंदकिशोर ठाकरेने २२ धावा केल्या. मुंबईच्या सुशांत घाडीने ३ तर संजय भालेरावने २ विकेट्स घेतल्या. सामनावीर संजय पवार ठरले.

**शिवाजी विद्यापीठ 'ब' संघाचा विजय**

लोणेरे संघाने १९.३ षटकांत १० बाद १०८ धावा केल्या. भरत गवंडेने ५८ धावा केल्या. शिवाजी विद्यापीठाच्या दीपक कांबळे व अनिल साळुंखे यांनी प्रत्येकी ३ विकेट्स घेतल्या. शिवाजी विद्यापीठ 'ब' संघाने १५ षटकांत ६ बाद ११४ धावांसह विजय साजरा केला. अनिल साळुंखेने ३१, अभिजित कोठावळेने १९ धावा केल्या.

**शिवाजी विद्यापीठ ७ विकेटस् राखून विजय**

नागपूर संघाने २० षटकांत ९ बाद ११८ धावा केल्या. अजित माळीने २०, अविनाश जाधवने १६ धावा केल्या. शिवाजी विद्यापीठाच्या विनायक शिंदे यांनी ३ तर विश्वनाथ वरूटे व सिध्दार्थ लोखंडे यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या. प्रत्युत्तरादाखल शिवाजी विद्यापीठाने ३ बाद १२१ धावांसह विजय साजरा केला. विनायक शिंदेने नाबाद ६०, प्रसाद देसाईने ४३ धावा केल्या. विनायक शिंदे सामनावीर ठरला.

**नांदेड विद्यापीठाचा ४ विकेट्सनी विजय**

नाशिक संघाने २० षटकात ७ बाद ८७ धावा केल्या. नांदेडच्या जयराम हंबर्डे व गोविंद सोनटक्के यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या. नांदेडने ६ बाद ८८ धावांसह विजय साजरा केला. नाशिकच्या लक्ष्मण शेंडेने ३, संदीप भागवतने २ विकेट्स घेतल्या.

पुढारी

# विद्यापीठात गुरुवारी परिसंवाद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र, पर्यावरणशास्त्र व यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (दि.२३) पर्यावरणशास्त्र सभागृहामध्ये सकाळी १०.३० वाजता आंतरराष्ट्रीय वन दिनानिमित्त 'जंगल आणि आदिवासी समाज' या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ डॉ. प्रकाश राऊत, पर्यावरण अभ्यासक उदय गायकवाड व श्रमिक मुक्ती दलाचे ज्येष्ठ कार्यकर्ते संपत देसाई मार्गदर्शन करणार आहेत. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

19 MAR 2023 पुढारी

# शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय माहितीपट महोत्सवाचे आयोजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी वर्ष महोत्सवानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम व मास कम्युनिकेशन अधिविभागातर्फे दि. २७ व २८ एप्रिलरोजी मानव्यशास्त्र सभागृहात 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय माहितीपट महोत्सवा'चे आयोजन केले आहे.

स्पर्धेत सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी नोंदणी अर्ज, महाविद्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र तसेच मेल ड्राईव्हच्या माध्यमातून माहितीपटाची क्लिप journalism@unishivaji.ac.in यां ई-मेल आयडीवर १७ एप्रिलपर्यंत पाठवणे आवश्यक आहे. महोत्सवात महाविद्यालयीन, विद्यापीठ स्तरावरील विद्यार्थी सहभाग घेऊ शकतील. महोत्सवाची मध्यवर्ती संकल्पना, सुचविलेले विषय, नियम, अटी, नोंदणी अर्ज नमुना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर http:///www.unishivaji.ac.in उपलब्ध आहे. स्पर्धेतील विजेत्यांना विविध स्वरूपाची पारितोषिके, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र देण्यात येणार असल्याची माहिती प्रा. डॉ. निशा पवार यांनी दिली.

सकाळ



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे राजर्षी शाहू स्मारक भवन येथे लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या जयंतीनिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी विचार मांडले. या वेळी शेजारी (डावीकडून) डॉ. अवनीश पाटील, डॉ. प्रकाश पवार उपस्थित होते.

# बाळासाहेब देसाईंचे राज्याच्या विकासात महत्त्वाचे योगदान

## डॉ. राजन गवस; शिवाजी विद्यापीठातर्फे व्याख्यान

कोल्हापूर, ता. १८ : लोकनेते "बाळासाहेब देसाई यांच्या नेतृत्वविकासामध्ये महात्मा गांधीजी यांच्या विचारांच्या भूमीचा मोठा वाटा आहे. महाराष्ट्राचे नवीन बदलते सर्वंकष स्वरुप निर्माण करण्यामध्ये त्यांची भूमिका आणि योगदान महत्त्वाचे राहिले', असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनामार्फत लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या जयंतीनिमित्त येथील राजर्षी शाहू स्मारक भवनात आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. प्रकाश पवार होते. डॉ. गवस यांनी व्याख्यानात यशवंतराव चव्हाण, लोकनेते बाळासाहेब देसाई, वसंतदादा पाटील यांची वैचारिक परंपरा आणि त्यामागील प्रेरणादायी इतिहास सांगितला.

ते म्हणाले, "पाटणसारख्या डोंगरी भागातून कोल्हापूरला येऊन अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून वर आलेले नेतृत्व म्हणजे लोकनेते बाळासाहेब देसाई होय. रस्ते, सिंचन, शिक्षण सुविधा महाराष्ट्रात पोहोचविण्याचे कार्य त्यांनी केले. महात्मा गांधीजींची नैतिकता आणि चारित्र्य, लोकांसाठी जगणे यातून बाळासाहेब देसाई यांचे नेतृत्व विकसित झाले. त्यांच्या नेतृत्वाला गांधीजींच्या विचारांची भूमी आणि खेड्यातील अनुभवांची जोड आहे. मंत्रीपद लोकांचे आहे, याची जाणीव बाळगून त्यांनी कार्य केले."

इतिहास विभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी प्रास्ताविकात अध्यासनाच्या कार्याचा आणि उपक्रमांचा आढावा घेतला. डॉ. दत्तात्रय मचाले यांनी आभार मानले.

## सर्वांगीण विकासासाठी मंत्रिपदाचा उपयोग

■ अध्यक्षीय मनोगतात डॉ. प्रकाश पवार म्हणाले, "लोकनेते बाळासाहेब देसाई हे नितीमान आणि चारित्र्यवान असे महाराष्ट्राला लाभलेले नेतृत्व होते. त्यांनी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी मंत्रीपदाचा उपयोग केला."

सकाळ

# शिवाजी विद्यापीठाच्या संघांसह मुंबई, नांदेड विद्यापीठ विजय

कोल्हापूर, ता. १८ : शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत प्राथमिक फेरीच्या सहाव्या दिवशी आज शिवाजी विद्यापीठाच्या दोन्ही संघांसह मुंबई व नांदेड विद्यापीठांनी विजय मिळविला.

पहिला सामन्यात मुंबई विद्यापीठाने नाशिकच्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठावर ५५ धावांनी विजय मिळवला. मुंबईचे संजय पवार 'सामनावीर' ठरले.

शिवाजी विद्यापीठ-ब संघाने लोणेरेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठावर चार गडी राखून विजय मिळवला. अनिल साळुंखे 'सामनावीर' ठरले.

शिवाजी विद्यापीठाने नागपूरच्या महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठावर सात गडी राखून मात केली. शिवाजी विद्यापीठाचे विनायक शिंदे सामनावीर ठरले. नांदेडच्या स्वामी रामानंदतीर्थ विद्यापीठाने नाशिकच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठावर चार गडी राखून पराभव केला. प्रकाश मोपडे 'सामनावीर' ठरले.

सकाळ



**कोल्हापूर : चेन्नई येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ ॲथलेटिक्स स्पर्धेत सर्वसाधारण विजेतेपद पटकावणाऱ्या शिवाजी विद्यापीठाच्या संघाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी स्वागत केले. या वेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. शरद बनसोडे आदी उपस्थित होते.**

# ॲथलेटिक्स संघाचे विद्यापीठात स्वागत

**कोल्हापूर, ता. १८ :** चेन्नई येथे झालेल्या ८२ व्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ ॲथलेटिक्स स्पर्धेत शिवाजी विद्यापीठास प्रथमच सर्वसाधारण विजेतेपद मिळवून देणाऱ्या संघाचे विद्यापीठात आज स्वागत करण्यात आले.

देशातील १७८ विद्यापीठे सहभागी झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत विजेता ठरलेला विद्यापीठाचा संघ आज चेन्नईहून विद्यापीठात दाखल झाला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांच्यासह अधिकाऱ्यांनी विजेत्या संघाचे स्वागत केले.

या वेळी डॉ. शिर्के म्हणाले, "विद्यापीठाच्या इतिहासात प्रथमच ॲथलेटिक्समध्ये सर्वसाधारण विजेतेपद मिळविण्याची कामगिरी करून सर्व ग्रामीण भागातील खेळाडूंनी आपले मैदानावरील प्रभुत्व राष्ट्रीय स्तरावर सिद्ध केले. ही बाब अभिनंदनीय आहे. खेळाडूंना जास्तीत जास्त सुविधा देऊन त्यांचे लक्ष केवळ सराव आणि स्पर्धा यांच्यावरच केंद्रित राहावे." दरम्यान, चेन्नई येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ ॲथलेटिक्स स्पर्धेत विद्यापीठ संघाने दोन सुवर्णपदकांसह एकूण १३ पदके मिळवली. मुलींच्या २१ किलोमीटर हाफ मॅरेथॉनमध्ये रेश्मा केवटेने सुवर्ण, तर १० हजार मीटर धावणे प्रकारात कांस्यपदक मिळविले.

मुलांच्या गटात २१ किलोमीटर हाफ मॅरेथॉन व १० हजार मीटर धावणे प्रकारात विवेक मोरे याने रौप्य, सुदेष्णा शिवणकरने १०० मीटरमध्ये सुवर्ण, २०० मीटरमध्ये रौप्य पदक मिळविले. अनुष्का कुंभारने ४०० मीटर अडथळा शर्यतीत रौप्य, रोहिणी पाटीलने ८०० मीटर धावणेत व उत्तम पाटीलने पाच हजार मीटर धावणे प्रकारात कास्यपदक पटकावले. प्राजक्ता शिंदेने १० हजार मीटर धावणेत रौप्य आणि पाच हजार मीटर धावणेत कांस्यपदक मिळविले. सुशांत जेधे याने ३ हजार मीटर ट्रिपलचेस धावणे स्पर्धेत व कुशल मोहितेने डेकॅथलॉन स्पर्धेत प्रत्येकी एक कांस्यपदक मिळवले. संघाला संघ व्यवस्थापक डॉ. सविता भोसले, प्रशिक्षक डॉ. इब्राहिम मुल्ला, संघ निवड समितीचे प्रमुख रामा पाटील यांचे मार्गदर्शन मिळाले.


1 9 MAR 2023
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जगण्याच्या गदारोळात मिसळता येऊ दे..

## 'कुसुमाग्रजांच्या शोधात...सौमित्र'चे बहारदार सादरीकरण

▸ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १८ : '... शंभराव्या प्रयोगाची मांड पहिल्यातच बसू दे, फुटू दे तरी इंद्रधनुष्य नवनवीन प्रयोगा-प्रयोगी एक तरी क्षण जिवंत होऊ दे... असू दे भान सतत जागं, माझं मलाच विंगेतून पाहता येऊ दे... घडता घडता नाटक सहज घडू दे... पडदा नेहमी नेमका पडू दे...दिपवू नकोस डोळे अंधारातून प्रकाशात, जगण्याच्या गदारोळात सहज मिसळता येऊ दे... रस्ता आणि पाय मला दोन्ही आवडू देत... शेवटी माझा मला मी पुन्हा सापडू दे...' अशी 'नटराजाप्रती एका नटाची प्रार्थना' या स्वरचित कवितेने कवी सौमित्र तथा अभिनेते किशोर कदम यांनी 'कुसुमाग्रजांच्या शोधात... सौमित्र' या त्यांच्या काव्य-नाट्याची नांदी आज शिवाजी विद्यापीठात केली.



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी 'कुसुमाग्रजांच्या शोधात... सौमित्र' या प्रयोगाचे सादरीकरण कवी सौमित्र तथा किशोर कदम यांनी केले.

### सादरीकरणासाठी कल्पक वापर

■ खरा अभिनेता रंगमंचाच्याच नव्हे, तर संपूर्ण प्रेक्षागृहाच्या पोकळीत कसा सामावला जातो, त्या समग्र अवकाशाचा सादरीकरणासाठी किती कल्पक वापर करून घेतो आणि त्या अवकाशालाही त्यातील प्रेक्षकांसह सादरीकरणाचा कसा भाग बनवून टाकतो, याचा प्रत्ययकारी अनुभव अभिनेता किशोर कदम यांनी सादरीकरणादरम्यान प्रेक्षकांना दिला.

५० मिनिटांच्या सादरीकरणाने रसिकांना खिळवून ठेवले. निमित्त होते शिवाजी विद्यापीठाच्या कवी कुसुमाग्रज स्मृती व्याख्यानमालेचे! वि. स. खांडेकर भाषाभवनात मराठी अधिविभागातर्फे आयोजित व्याख्यानमालेच्या अध्यक्षस्थानी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, तर मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे उपस्थित होते. कवी कुसुमाग्रज आणि नाटककार वि. वा. शिरवाडकर यांच्यातील धागा उलगडण्याचा प्रयत्न करतानाच कवी सौमित्र यांनी काव्यविश्व, अभिनय आणि रंगभूमीशी त्यांचे नाते जोडून पाहण्याचा प्रयत्न केला. सादरीकरणामध्ये कुसुमाग्रजांच्या नाटकांतील काही प्रवेश, स्वगतं, काही कुसुमाग्रजांच्या, स्वतःच्या तर काही अन्य कवींच्या कवितांचाही समावेश होता. यामुळे रसिकांना सलग आणि सुसूत्र सादरीकरणाचा आनंद मिळाला.

सकाळ

# राजर्षी माहितीपट महोत्सवात सहभागाचे आवाहन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन अधिविभागातर्फे 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय माहितीपट महोत्सव' २७ व २८ एप्रिलला होत आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी वर्ष महोत्सवानिमित्त त्याचे आयोजन केले आहे. मानव्यशास्त्र सभागृहात हा महोत्सव होईल. महोत्सवात महाविद्यालयीन, विद्यापीठ स्तरावरील विद्यार्थी सहभाग घेऊ शकतील. इच्छुकांनी नोंदणी अर्ज, महाविद्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र मेल ड्राईव्हच्या माध्यमातून माहितीपटाची क्लिप journalism@unishivaji.ac.in मेलवर १७ एप्रिल सायंकाळी पाच वाजेपर्यंत पाठवावी. महोत्सवात प्रवेशासाठी नोंदणी करणे आवश्यक असून प्रवेश निःशुल्क आहे. महोत्सवाची मध्यवर्ती संकल्पना, सुचविलेले विषय, नियम, अटी तसेच नोंदणी अर्ज नमुना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर http://www.unishivaji.ac.in उपलब्ध आहे. महोत्सवात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांनी प्रवास व इतर खर्च स्वतः करायचा आहे. अधिक माहितीसाठी सह-समन्वयक डॉ. सुमेधा साळुंखे व परशराम पवार यांच्याशी विभागाच्या journalism@unishivaji.ac.in मेलवर संपर्क साधावा, असे आवाहन अधिविभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. निशा पवार यांनी केले आहे.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

Estd : 1962
'A++' Accredited by NAAC
(2021)
with CGPA 3.52

## ५९ वा वार्षिक दीक्षांत समारंभ
## विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचे निवेदन

सर्व स्नातक आणि संबंधित घटकांना कळविण्यात येते की, गुरुवार दि. १६ फेब्रुवारी, २०२३ रोजी होणारा ५९ वा दीक्षांत समारंभ काही अपरिहार्य कारणास्तव स्थगित करण्यात आला होता. सदरचा दीक्षांत समारंभ बुधवार दिनांक २९/०३/२०२३ रोजी संपन्न होत आहे. याची नोंद घ्यावी.

दीक्षांत समारंभाच्या अनुषंगाने संपूर्ण माहिती सर्व संबंधितांकरीता नजिकच्या कालावधीमध्ये विद्यापीठाचे संकेतस्थळावर (www.unishivaji.ac.in) प्रसिद्ध करणेत येईल याची नोंद घ्यावी.

**दीक्षांत विभाग**
दि:१९/०३/२०२३

**डॉ. अजितसिंह एन. जाधव**
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

19 MAR 2023 तरुण भारत

# महात्माजींच्या विचारभूमीतून लोकनेते देसाईंचे नेतृत्व फुलले

## ज्येष्ठ साहित्यिक राजन गवस : बाळासाहेब देसाई अध्यासनातर्फे व्याख्यान

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या नेतृत्वविकासामध्ये महात्मा गांधी यांच्या विचारांच्या भूमीचा मोठा वाटा आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी आज येथे केले. शिवाजी विद्यापीठाच्या लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनामार्फत लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या जयंतीनिमित्त येथील राजर्षी शाहू स्मारक भवनात डॉ. गवस यांचे विशेष व्याख्यान आयोजित केले होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. प्रकाश पवार होते.

डॉ. गवस यांनी आपल्या व्याख्यानात यशवंतराव चव्हाण, लोकनेते बाळासाहेब देसाई, वसंतदादा पाटील यांची वैचारिक परंपरा आणि त्यामागील प्रेरणादायी इतिहास सांगितला. ते म्हणाले, जनमानसामध्ये या लोकनेत्यांविषयी प्रचंड अढळ श्रद्धा होती. पाटणसारख्या डोंगरी भागातून कोल्हापूरला येऊन अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून भूमीतून म्हणजेच अगदी तळागाळातून वर आलेले नेतृत्व म्हणजे लोकनेते बाळासाहेब देसाई होय. रस्ते, सिंचन, शिक्षण इत्यादी सुविधा संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचविण्याचे कार्य त्यांनी केले. महाराष्ट्राचे एक नवीन बदलते सर्वंकष स्वरुप निर्माण करण्यामध्ये त्यांची भूमिका महत्वाची राहिली. महात्मा गांधीजींची नैतिकता आणि चारित्र्य, लोकांसाठी जगणे यातून बाळासाहेब देसाई यांचे नेतृत्व विकसित झाले. त्यांच्या नेतृत्वाला गांधीजींच्या विचारांची भूमी आणि खेड्यातील अनुभवांची जोड आहे.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात बोलताना ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस. सोबत डॉ. अवनीश पाटील व डॉ. प्रकाश पवार.**

आपले मंत्रीपद हे सर्वसामान्य लोकांचे आहे, याची जाणीव बाळगून त्यांनी कार्य केले. डॉ. प्रकाश पवार म्हणाले की, लोकनेते बाळासाहेब देसाई हे नीतीमान आणि चारित्र्यवान असे नेतृत्व होते. त्यांनी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी मंत्रीपदाचा उपयोग केला. यावेळी इतिहास अधिविभाग प्रमुख तथा अध्यासनाचे समन्वयक डॉ. अवनीश पाटील यांनी प्रास्ताविकात २०१६ पासून अध्यासनाच्या कार्याचा आणि उपक्रमांचा आढावा घेतला. डॉ. दत्तात्रय मचाले यांनी आभार मानले.